सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०१ | सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे
अभीष्टचिंतन



श्री. कृषिकेश रावले
आयपीएस

## उन्हाची तीव्रता पशु-पक्ष्यांना मारक; आपली मदत वाचवू शकते जीवन !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्या उन्हाळा अत्यंत कडक झाला आहे. मार्च महिन्यापासूनच वातावरण तापू लागले आहे.सध्या तापमान 40 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे.

अशा कडक उन्हाळ्यात माणसासारखेच पशु-पक्ष्यांनाही पाण्याची अत्यंत गरज असते. पाणी न मिळाल्यास पशुपक्ष्यांचे प्राण कासावीस होऊ शकतात. गावात किंवा शहरात भटकताना दिसणाऱ्या मुक्या प्राण्यांना पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी वन-वन भटकताना पाहणे दुःखद आहे. आपले छोटेसे कर्तव्य पशुपक्ष्यांची तहान भागवू शकते. त्यामुळे या दिवसामध्ये पशुपक्ष्यांसाठी प्रत्येकांनी एक छोटासा प्रयत्न करणे गरजेचे आहे.घराच्या बाहेर स्वच्छ भांडे पाण्याने भरा. सकाळी व संध्याकाळी पाणी बदलणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून प्राणी नेहमी थंड पाणी मिळवू शकतील. एका भांड्यात ठेवलेले पाणी एका प्राण्याचे जीवन वाचवू शकते

उन्हाळ्यात चारा व पाण्याची कमतरता अनेक प्राण्यांचे प्राण घेते. आपली लहानशी मदत, जसे की भांडे पाण्यासाठी ठेवणे किंवा अन्न पुरवणे, एका जिवाचे जीवन वाचवू शकते. ही सेवा केवळ भूतदयेने केली जाते आणि यातून मिळणारा आत्मिक आनंद अमूल्य आहे. मुक्या प्राण्यांसाठी थोडासा प्रयत्न करणे म्हणजे एका जिवाचे जीवन वाचविणे. प्रत्येक जीव अमूल्य आहे. त्याला वाचविणे आपले कर्तव्य आहे. सध्या तापमानाचा प्राण्यांना मोठा फटका बसत आहे. त्यामुळे पशुपक्ष्यांची तहान भागविणे गरजेचे आहे.उरलेला भाजीपाला, पालेभाजी किंवा अन्न कचऱ्यात टाकू नका. स्वच्छ कागदावर किंवा एका साफ जागी ठेवा, जेणेकरून भटके प्राणी सहज पोहोचू शकतील. एप्रिलच्या सुरुवातीला उन्हाचे चटके बसत आहे. पुढे मे महिन्यात तर आणखी तापमान वाढण्याची शक्यता आहे.




### जोडीदार मिळेना.. अपेक्षा सुटेचना...

# योग्य पती-पत्नीच्या शोधात उरतोय एकाकीपणा...!

### लग्नाचे वय उलटल्याने अनेकांना बोहल्यावर चढणे कठीण; सामाजिक स्थिती

**रजनीकांत पाटील : ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : ग्रामीण भागातील बदलत्या सामाजिक आणि आर्थिक वास्तवामुळे विवाह जुळविण्याची पारंपरिक प्रक्रिया दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीची बनत चालली आहे. मुलींचे घटते प्रमाण, वाढती बेरोजगारी, करिअरकेंद्री विचारसरणी आणि वधू-वरांकडून वाढलेल्या अपेक्षा यामुळे अनेक कुटुंबांना योग्य स्थळ शोधताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी, विवाहयोग्य वय ओलांडूनही अनेक युवक अविवाहित राहिल्याचे चित्र सध्या ठळकपणे समोर येत आहे. काही वर्षांपूर्वी मुलींसाठी योग्य वर शोधणे हे वधूपित्यांसाठी मोठे आव्हान मानले जात होते. अनेक वेळा हुंड्याची तयारी ठेवूनच विवाह जुळवावे लागत. मात्र, सध्याच्या बदलत्या परिस्थितीत हे समीकरण पूर्णपणे उलटले आहे. मुलींचे प्रमाण घटल्याने आता वरपित्यांनाच वधूपित्यांचे उंबरठे झिजवावे लागत असून, काही नको, पण मुलगी हवी, अशी भूमिका अनेक कुटुंबांकडून घेतली जात आहे.**





#### तिशी ओलांडणाऱ्यांची वाढती संख्या

उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि करिअरमध्ये स्थैर्य मिळविण्याच्या ध्यासामुळे मुला-मुली दोघांमध्येही विवाह उशिरा करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे तिशी ओलांडणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. वय वाढल्याने अपेक्षा अधिक स्पष्ट आणि कठोर होत जातात, परिणामी जुळणीची प्रक्रिया आणखी क्लिष्ट बनते.

#### पर्यायी मार्गांचा शोध

स्थळ मिळण्यात अडचणी येत असल्याने काही कुटुंबांनी पर्यायी मार्गांचा स्वीकार करण्यास सुरुवात केली आहे. अनाथाश्रमातील मुलींशी विवाह करण्याचा पर्याय काहीजण निवडत आहेत. तसेच, वधू-वर सूचक मंडळांकडे नोंदणी करणाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. या मंडळांच्या माहितीनुसार, नोंदणीकृत उमेदवारांमध्ये तिशी ओलांडलेल्यांचे प्रमाण तब्बल 50 टक्यांपर्यंत पोहोचले आहे. मात्र, अपेक्षा आणि वास्तव यातील तफावत मोठी असल्याने जुळणीची प्रक्रिया संथ गतीनेच पुढे सरकत आहे.

#### बेरोजगारीचा मोठा अडथळा

या संपूर्ण समस्येमागे बेरोजगारी हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरत आहे. शिक्षण पूर्ण करूनही अनेक युवक नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. खासगी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये कमी पगार आणि अस्थिरता असल्याने अशा युवकांना विवाहासाठी कमी पसंती दिली जाते. याउलट, सरकारी नोकरी, चांगल्या पगाराची स्थिर नोकरी किंवा शहरात स्वतःचा व्यवसाय असलेले युवक अधिक मागणीत आहेत. यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि छोट्या व्यवसायातील तरुणांसाठी विवाह जुळविणे अधिक कठीण बनले आहे.

#### परजिल्हा-परराज्यातही शोध

स्थळांच्या शोधासाठी आता पालक परजिल्हा तसेच परराज्यांमध्येही प्रयत्न करत आहेत. मात्र, तेथेही अपेक्षांमधील दरी मोठी असल्याने अनेक वेळा विवाह जुळत नाहीत. त्यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून,

#### अपेक्षांचा वाढता बोजा

वधूंकडून अपेक्षांची पातळी लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून येते. उच्चशिक्षित, निर्व्यसनी, चांगल्या पगाराची नोकरी करणारा, शहरात स्थायिक आणि स्वतःचे घर असलेला वर अशा अपेक्षा सर्वसाधारणपणे व्यक्त केल्या जातात. याशिवाय शेतीही असावी, अशी अपेक्षा अनेक ठिकाणी मांडली जाते. शेतकरी नवरा नको; पण शेती हवी, ही विसंगती ग्रामीण भागात प्रकर्षाने जाणवत आहे.

#### 'विकत वधू' प्रकारात फसवणुकीचे प्रकार

काही ठिकाणी विवाहासाठी परजिल्ह्यातून 'विकत वधू' आणण्याचे प्रकारही वाढले आहेत. मात्र, या प्रक्रियेत अनेक कुटुंबांची फसवणूक झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. लग्नासाठी मोठा खर्च करून, कर्ज काढून विवाह लावून दिल्यानंतर काही वधू दागिने व रोख रक्कम घेऊन पसार झाल्याच्या घटना तालुक्यातील विविध भागांत घडल्याचेही सांगितले जाते. त्यामुळे अशा प्रकारांबाबत सावधगिरी बाळगण्याची गरज व्यक्त होत आहे.

#### वाढते आव्हान, अनुत्तरित प्रश्न

एकूणच बदलत्या सामाजिक रचनेमुळे आणि आर्थिक वास्तवामुळे ग्रामीण भागातील विवाह संस्था नव्या आव्हानांना सामोरी जात आहे. योग्य वयात विवाह होणे हीच अनेक कुटुंबांसाठी मोठी कसरत ठरत आहे. बदलत्या परिस्थितीत परंपरा, अपेक्षा आणि वास्तव यामध्ये समतोल साधणे आवश्यक बनले असून, अन्यथा लग्नाचा बार कधी उडणार? हा प्रश्न अनेकांच्या आयुष्यात अनुत्तरितच राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

अमळनेरमध्ये १७ एप्रिलला 'आखाजी महोत्सव' पान २

आर्मीमधील कुत्र्यांना रिटायरमेंटनंतर मारले जाते? पान ४

वरुथिनी एकादशीचे महत्त्व काय? पान ४

### ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले यांचे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले (वय ९२) यांनी आज रविवार, दि. १२ एप्रिल रोजी दुपारी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. आपल्या चिरतरुण आवाजाने संपूर्ण जगाला भुरळ घालणाऱ्या आशाताई आता काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत.

छातीत संसर्ग झाल्याने त्यांना शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी रात्री उशिरा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल केले होते. आज दुपारी आशाताई यांचे पुत्र आनंद भोसले यांनी आशाताईंच्या निधनाची माहिती दिली. आशाताईंचे पार्थिव उद्या सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत लोअर परळ येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क या ठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. आशाताईंच्या जाण्याने हिंदी, मराठी चित्रपटसृष्टी, गायन क्षेत्र आणि कला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

## दिवंगत संजय चौधरी यांच्या स्मृत्यर्थ बस स्थानकासमोर पाणपोई कार्यान्वित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भीषण उन्हाळ्याची चाहूल लागताच तहानलेल्या प्रवाशांची आणि नागरिकांची सोय व्हावी या उदात्त हेतूने, अमळनेर येथील दिवंगत संजय प्रल्हाद चौधरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ बस स्थानकासमोर पाणपोई सुरू करण्यात आली आहे.

या पाणपोईचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार धनंजय सोनार, नगरसेवक नरेंद्र संदानशिव व राजाराम चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. विशेष म्हणजे, संजय चौधरी यांचा नातू माहीर पवन चौधरी या बालकाच्या हस्ते श्रीफळ वाढवून जलसेवेचा प्रारंभ करण्यात आला.

दिवंगत संजय चौधरी यांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांचे सुपुत्र आणि तेली युवा समितीचे माजी अध्यक्ष पवन संजय चौधरी यांच्या वतीने दरवर्षी 11 एप्रिल रोजी ही पाणपोई सुरू केली जाते. बसस्थानक परिसरात प्रवाशांची मोठी वर्दळ असते त्यामुळे शेकडो तृषार्त नागरिकांची तहान भागण्यास मदत होत आहे.

या प्रसंगी पवन संजय चौधरी यांच्यासह नातू माहीर चौधरी, नंदू चौधरी, अनिल चौधरी, रवींद्र पाटील, शशिकांत आढावे, सुनील चौधरी, तुषार संदानशिव, दत्तू लांडगे, गुलाब पाटील, महेंद्र पाटील, किसन पाटील आदी मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **वडीलांच्या आठवणींना सामाजिक कार्याची जोड देण्यासाठी आम्ही दरवर्षी हा उपक्रम राबवतो. प्रवाशांची तहान भागवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे.**
>
> **- पवन संजय चौधरी**
> **अमळनेर**




**अमळनेर : दिवंगत संजय प्रल्हाद चौधरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ बस स्थानकासमोर पाणपोईचे लोकार्पण करताना उपस्थित मान्यवर.**

### श्री गोरक्षनाथ जन्मोत्सव उत्सव

## वरुथिनी एकादशीनिमित्त नवनाथ चैतन्य महापूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्राचीन नाथ संजीवन समाधी मंदिरात चैत्र वद्य वरुथिनी एकादशीनिमित्त सोमवार (दि. 13) परमपूज्य श्री गोरक्षनाथ जन्मोत्सव व नवनाथ चैतन्य महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी नाशिक येथून मोठ्या संख्येने नवनाथ भक्त मंडळी अमळनेर येथे येणार असून, संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमणार आहे. प्राचीन नाथस्थानावर योगी श्री गोरक्षनाथांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून, दरवर्षी नवनाथ भक्त मंडळाच्या वतीने मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात गोरक्षनाथ जयंती व नवनाथ चैतन्य महापूजा साजरी केली जाते.

अमळनेर-चोपडा रोडवरील गायत्री शक्तिपीठामागे असलेले हे नाथपंथीय समाधी मंदिर साधारणतः तेराव्या शतकातील असल्याचे मानले जाते. भव्य दगडांमध्ये उभारलेले हे मंदिर स्थापत्यदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असून, मंदिरात प्रवेश करण्यासाठी सुमारे तीन फूट उंचीचे दगडी प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर सुमारे पाच फूट उंच चौथऱ्यावर नाथपंथीय सिद्धांच्या दोन शिवलिंगाकार संजीवन समाधी पाहायला मिळतात. या पवित्र स्थानाचा उल्लेख दिल्लीच्या अल्लाउद्दीन बादशहाने नाथपंथीय तोरणमाळ मठाला दिलेल्या सनदेतही आढळतो, ज्यामुळे या स्थळाचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व अधोरेखित होते.यंदाही विविध धार्मिक विधी, पूजन आणि आरतीद्वारे जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. श्री गोरक्षनाथ जन्मोत्सवानिमित्त मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी अपेक्षित असून, सर्वांनी शिस्त व भक्तिभाव राखून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नाथ परिवार आणि नवनाथ भक्त मंडळ, अमळनेर यांनी केले आहे.



***अमळनेर : नाथ संजीवन समाधी मंदिर. इन्सेटमध्ये परमपूज्य श्री गोरक्षनाथ मूर्ती.***

### टाकरखेडा येथे कौटुंबिक वाद

## धारदार शस्त्राने हल्ला, १२ जणांवर गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर :** तालुक्यातील टाकरखेडा परिसरात कौटुंबिक वादातून गंभीर मारहाणीची घटना घडली असून या प्रकरणी १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी व्यक्तीवर अमळनेर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे आपल्या कुटुंबासह शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या मुलीने ६ मार्च २०२६ रोजी गावातील एका युवकासोबत प्रेमविवाह केल्याने संबंधित कुटुंबीयांमध्ये वाद निर्माण झाला होता. याच कारणावरून काही आरोपी फिर्यादीला वारंवार धमक्या देत असल्याचे सांगण्यात आले आहे.

दि. १० एप्रिल रोजी दुपारी काही आरोपी फिर्यादीच्या घरासमोर संशयास्पद वर्तन करत होते. याबाबत विचारणा केल्यावर महिलांनी शिवीगाळ केल्याचेही फिर्यादीने नमूद केले आहे.

त्याच दिवशी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास आरोपींनी फिर्यादीच्या घराचा दरवाजा ठोठावून आत प्रवेश केला. यावेळी एका आरोपीने धारदार शस्त्राने फिर्यादीवर वार करून गंभीर जखमी केले. पत्नीने बचावासाठी धाव घेतल्यावर तिच्यावरही हल्ला करण्यात आला. मुलगा मदतीला आल्यावर त्यालाही लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली. घटनेदरम्यान नातेवाईक व गावातील नागरिक मदतीला धावून आले असता, त्यांनाही लोखंडी सळई व दगड-विटांनी मारहाण करण्यात आली. हल्लेखोरांनी जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेनंतर जखमींना तातडीने अमळनेर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी जगदीश भास्कर पाटील (रा. कंडारी) यांच्यासह टाकरखेडा येथील एकूण १२ जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची नोंद करून पुढील तपास पोलीस हवालदार संदेश पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## संपादकीय

# संशयाची सावली कायम!

सध्या राज्यातील राजकारणात पडद्यामागे घडणाऱ्या हालचालींनी पुन्हा एकदा खळबळ उडवली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना ठाकरे गटातील काही खासदारांच्या कथित गुप्त बैठकीच्या चर्चेमुळे राजकीय वातावरण तापले आहे. या बैठकीत ९ पैकी ८ खासदार उपस्थित होते, असा दावा केला जात असला तरी संबंधित खासदारांनी त्याचे खंडन केले आहे. मात्र, या चर्चेने एक वेगळाच प्रश्न उपस्थित केला आहे. शिवसेना ठाकरे गटात खरोखरच अंतर्गत असंतोष उसळतो आहे का? राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी या प्रकरणावर भाष्य करताना स्पष्टपणे सांगितले, की ठाकरे गटात 'खदखद' आहे. त्यांच्या वक्तव्याने केवळ आरोप–प्रत्यारोपांची पातळी वाढवली नाही, तर त्या गटातील अंतर्गत तणावावरही प्रकाश टाकला. राजकारणात अशा प्रकारच्या विधानांना केवळ राजकीय टोलेबाजी म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. कारण त्यामागे अनेकदा वास्तवाचा अंश दडलेला असतो. ऑपरेशन टायगर ही संज्ञा सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ठाकरे गटातील नेत्यांना आपल्याकडे खेचण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे चित्र रंगवले जात आहे. मात्र, सरनाईक यांच्या मते हे ऑपरेशन केवळ खासदारांपुरते मर्यादित नाही, तर सामान्य शिवसैनिकांपर्यंत पोहोचणारे आहे. म्हणजेच हा केवळ राजकीय समीकरणांचा खेळ नसून, विचारसरणीच्या नावाखाली सुरू असलेली संघटनात्मक पुनर्रचना आहे, असे म्हणावे लागेल.

या संपूर्ण प्रकरणात सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'गुप्त बैठक'. जर खरोखरच अशी बैठक झाली असेल, तर ती गुप्त का ठेवावी लागली? आणि जर झालीच नसेल, तर अशा बातम्या कोण आणि का पसरवत आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधणे अत्यंत आवश्यक आहे. कारण राजकारणात अफवा हे देखील एक प्रभावी शस्त्र असते. योग्यवेळी योग्य अफवा पेरल्यास संपूर्ण पक्षात अस्थिरता निर्माण होऊ शकते. अरविंद सावंत यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत आठ खासदारांची नावे पुढे आली. मात्र, अनिल देसाई यांचे नाव त्यात नसल्याचे सांगितले गेले. यावरून सरनाईक यांनी सूचित केलेले 'आपापसातील मतभेद' हे वास्तव असू शकते. एखाद्या पक्षात सर्व काही सुरळीत असेल, तर अशा प्रकारचे नावांचे राजकारण उघडपणे समोर येत नाही. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ बाह्य आरोप म्हणून न पाहता त्या मागील अंतर्गत स्थिती समजून घेणे गरजेचे आहे. शिवसेना हा पक्ष नेहमीच संघटनशक्ती आणि निष्ठा यासाठी ओळखला जातो. बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात पक्षातील शिस्त आणि एकजूट हीच त्याची खरी ताकद होती. मात्र, सध्याच्या परिस्थितीत त्याच पक्षात दोन गट पडलेले दिसतात आणि दोन्ही गट एकमेकांवर आरोप करताना दिसतात. ही परिस्थिती केवळ राजकीय संघर्ष नसून, विचारसरणीच्या वारशावर चाललेली लढाई आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गटावर सतत दबाव वाढत असल्याचे चित्र आहे. निवडणुकांमधील अनुभव, कार्य कर्त्यांमध्ये असलेली नाराजी, आणि नेतृत्वावर होणारे प्रश्नचिन्ह या सर्वांचा परिणाम म्हणून 'अंतर्गत धुसफूस' हा मुद्दा पुढे येत आहे. दुसरीकडे एकनाथ शिंदे यांचा गट स्वतःला बळकट करण्याच्या प्रयत्नात आहे आणि त्यासाठी विरोधी गटातील नाराज नेत्यांना आकर्षित करण्याची रणनीती वापरत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचा मुद्दाही समोर येतो.

सरनाईक यांनी स्पष्टपणे सांगितले, की भाजप त्यांच्या कामात हस्तक्षेप करत नाही. मात्र, राज्यातील सत्तासमीकरण पाहता भाजप आणि शिंदे गट यांच्यातील समन्वय हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे 'ऑपरेशन टायगर'सारख्या हालचालींमध्ये अप्रत्यक्ष पाठिंबा आहे का, हा प्रश्न उपस्थित होणे स्वा भाविक आहे. राजकारणात सत्ता टिकवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी विविध डावपेच खेळले जातात. कधी ते उघडपणे असतात, तर कधी पडद्यामागे. सध्याच्या प्रकरणातही हेच दिसून येते. गुप्त बैठकांच्या चर्चा, खासदारांच्या नावांची यादी आणि अंतर्गत मतभेदांचे संकेत या सर्वांचा एकत्रित विचार केला, तर राज्यातील राजकारण एका महत्त्वाच्या वळणावर उभे आहे, असे स्पष्ट होते. याचा सर्वांत मोठा परिणाम सामान्य कार्यकर्त्यावर होतो. पक्षातील अंतर्गत कलहामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. कोणाच्या मागे उभे राहायचे, कोणावर विश्वास ठेवायचा आणि कोणाची भूमिका योग्य आहे या प्रश्नांची उत्तरे शोधताना कार्यकर्ता गोंधळून जातो. त्यामुळे पक्षाची मूळ ताकद कमकुवत होते. शेवटी या संपूर्ण घडामोडींकडे पाहताना एक गोष्ट स्पष्ट होते, की राजकारणात स्थिरता ही कायमस्वरूपी नसते. परिस्थितीनुसार समीकरणे बदलतात, मित्र–शत्रू बदलतात आणि भूमिका बदलतात. मात्र, जनतेचा विश्वास टिकवणे हेच कोणत्याही पक्षासाठी सर्वांत मोठे आव्हान असते. आज 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा आहे, उद्या कदाचित दुसरे काही असेल. पण या सर्वांमध्ये जर पारदर्शकता आणि स्पष्टता नसेल, तर संशयाची सावली कायम राहते. राजकारणात एकदा संशय निर्माण झाला, की तो दूर करणे अत्यंत कठीण असते. म्हणूनच सत्तेच्या या सावल्यांमधून बाहेर पडण्यासाठी केवळ राजकीय डावपेच नव्हे, तर प्रामाणिकपणा आणि विश्वासार्हता यांची गरज आहे. अन्यथा सावल्या अधिक गडद होत जातील आणि सत्य अधिकच धूसर होईल.

# रॉबर्ट वॉटसन–वॅट: रडार यंत्रणेचे जनक आणि आधुनिक युगाचे रक्षक

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात 'रडार' ही यंत्रणा केवळ लष्करी संरक्षणासाठीच नाही, तर विमान वाहतूक आणि हवामान अंदाजासाठीही कणा मानली जाते. या क्रांतिकारी यंत्रणेचे श्रेय जाते स्कॉटिश भौतिकशास्त्रज्ञ सर रॉबर्ट वॉटसन–वॅट यांना. त्यांच्या जन्मदिनानिमित्त (13 एप्रिल 1892) त्यांच्या कार्याचा हा विशेष आढावा.

रॉबर्ट वॉटसन–वॅट यांचा जन्म स्कॉटलंडमधील 'ब्रेचिन' येथे झाला. ते जेम्स वॅट (वाफेच्या इंजिनाचे शोधक) यांचे वंशज होते. सेंट अँड्र्यूज विद्यापीठातून पदवी पूर्ण केल्यानंतर, त्यांनी हवामान खात्यात काम करण्यास सुरुवात केली. तिथेच त्यांना रेडिओ लहरींचा वापर करून विजांच्या




कडकडाटाचा मागोवा घेण्याची कल्पना सुचली. 1930 च्या दशकात जगावर दुसऱ्या महायुद्धाचे सावट होते. ब्रिटनला भीती होती की शत्रूची विमाने त्यांच्यावर कधीही हल्ला करू शकतात. तेव्हा वॉटसन–वॅट यांनी 'डेथ रे' (शत्रूचा नाश करणारे किरण) बनवता येईल का, यावर संशोधन सुरू केले. संशोधनादरम्यान त्यांना जाणवले की 'डेथ रे' पेक्षा 'रेडिओ डिटेक्शन' जास्त प्रभावी ठरेल. त्यांनी सिद्ध केले की, रेडिओ लहरी एखाद्या धातूच्या वस्तूला (विमानाला) धडकून परत येतात, ज्यावरून त्या वस्तूचे अंतर आणि दिशा ओळखता येते. 26 फेब्रुवारी 1935 रोजी त्यांनी 'डेव्हेंट्री' येथे रेडिओ लहरींच्या मदतीने विमानाचा शोध यशस्वीपणे लावून दाखवला. यालाच पुढे रडारअसे नाव देण्यात आले. वॉटसन–वॅट यांच्या रडार यंत्रणेमुळे ब्रिटनने समुद्रकिनाऱ्यावर 'चेन होम' नावाचे रडार स्टेशनचे जाळे उभारले. यामुळे 'बॅटल ऑफ ब्रिटन' दरम्यान जर्मन हवाई दलाचे विमान येण्यापूर्वीच ब्रिटिश सैन्याला त्याची सूचना मिळत असे. यामुळे हजारो लोकांचे प्राण वाचले आणि युद्धाचे पारडे फिरले.

रडारचे कार्य सोप्या भाषेत ट्रान्समिटर रेडिओ लहरी आकाशात सोडतो. जर समोर विमान किंवा कोणतीही वस्तू असेल, तर या लहरी तिला धडकून परत फिरतात. परत आलेल्या लहरी पकडल्या जातात आणि पडद्यावर त्या वस्तूचे स्थान दिसते. त्यांच्या अतुलनीय कार्यासाठी 1942 मध्ये त्यांना 'नाईटहूड' प्रदान करण्यात आला. 1946 मध्ये त्यांना अमेरिकेचा 'मेडल ऑफ मेरिट' हा सन्मान मिळाला. 1941 मध्ये त्यांची 'रॉयल सोसायटी'चे फेलो म्हणून निवड झाली.

रॉबर्ट वॉटसन–वॅट यांनी केवळ एका यंत्राचा शोध लावला नाही, तर त्यांनी विज्ञानाचा वापर संरक्षणासाठी कसा करावा, याचा वस्तुपाठ घालून दिला. आज आपण जे सुरक्षित विमान प्रवास करतो किंवा चक्रीवादळाची पूर्वसूचना



मिळवतो, त्यामागे या 'रडार मॅन'ची दूरदृष्टी दडलेली आहे. अशा या थोर शास्त्रज्ञाला त्यांच्या जन्मदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

# अमळनेरमध्ये १७ एप्रिलला 'आखाजी महोत्सव'

## खानदेशी लोककला, परंपरांचे घडणार दर्शन; महिलांच्या सुप्त गुणांना मिळणार स्पर्धांद्वारे वाव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : खानदेशातील सण–उत्सवांची समृद्ध परंपरा संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. 'अक्षय्य तृतीया' म्हणजेच 'आखाजी'. हा केवळ सण नाही, तर तो खानदेशच्या संस्कृतीचा कणा आहे. या वारशाची जपणूक करण्यासह नव्या पिढीला आपल्या मुळांची ओळख करून देण्यासाठी अमळनेर नगरीत प्रथमच खानदेश साहित्य संघातर्फे येत्या शुक्रवारी, १७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता भव्य 'आखाजी महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून आपल्याला खानदेशी लोककला, गाणी आणि प्रथा–परंपरांचे दर्शन घडणार आहे. विशेषतः महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशातून विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत, अशी माहिती साने गुरुजी शिक्षक साहित्य संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय कृष्णा पाटील यांनी दिली.



अमळनेर : खानदेश साहित्य संघातर्फे येथील पत्रकार भवनात रविवारी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना साने गुरुजी शिक्षक साहित्य संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय कृष्णा पाटील. शेजारी जिल्हाध्यक्ष शरद धनगर, जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर, जिल्हा कार्याध्यक्ष वाल्मीक मराठे.

येथील पत्रकार भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. खानदेश साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी, जळगाव जिल्हाध्यक्ष शरद धनगर, उपाध्यक्ष डी. ए. धनगर, कार्याध्यक्ष वाल्मीक मराठे व सचिव उमेश काटे यासह साहित्य संघाचे पदाधिकारी व सदस्य यावेळी उपस्थित होते.

संजय पाटील म्हणाले, की खानदेश महोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी (केंद्रीय अध्यक्ष, खानदेश साहित्य संघ) यांची निवड करण्यात आली असून, राजेशजी पांडे (प्रदेश सरचिटणीस, भाजप) उद्घाटक, अशोक आधार पाटील (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर) स्वागताध्यक्ष, तर प्रा. डॉ. योगीता पाटील (अहिराणी लेखिका, धुळे) या 'ग्रामीण संस्कृतीतील आखाजी महोत्सव' या विषयावर मार्गदर्शन करणाऱ्या प्रमुख वक्त्या असतील. तर प्रमुख पाहुणे म्हणून स्मिताताई उदय वाघ (खासदार, जळगाव लोकसभा मतदारसंघ), अनिलदादा भाईदास पाटील (माजी मंत्री तथा आमदार, अमळनेर), कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, डॉ. बी. एस. पाटील, मा. शिरीष हिरालाल चौधरी (तिघे, माजी आमदार, अमळनेर ), डॉ. परीक्षित बाविस्कर (लोकनियुक्त नगराध्यक्ष, अमळनेर), प्रशांत मनोहर निकम (उपनगराध्यक्ष, अमळनेर नगर परिषद), ॲड. व्ही. आर. पाटील, (माजी जि. प. सदस्य, जळगाव), विक्रांत भास्करराव पाटील (माजी नगरसेवक, अमळनेर), डॉ. अविनाश रघुराज जोशी (अध्यक्ष, मराठी वाङ्मय मंडळ, अमळनेर), डॉ. डिगंबर विठ्ठल महाले (अध्यक्ष, मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर), सचिन बाळू पाटील (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर), अमेय प्रकाश मुंदडा (मुंदडा बिल्डर्स, अमळनेर), सौ. रिताताई भूपेंद्र बाविस्कर (प्रदेशाध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथालय विभाग), प्रवीण गंगाराम पाटील (राजू फापोरेकर, नगरसेवक, अमळनेर), सचिन बळवंत पाटील (नगरसेवक, अमळनेर), प्राचार्य रत्नाताई पाटील, (खजिनदार, खानदेश साहित्य संघ, महाराष्ट्र), रमेश आप्पा बोरसे (सचिव, खानदेश साहित्य संघ, महाराष्ट्र) जयेशकुमार काटे (संस्थापक अध्यक्ष, शिवशाही फाउंडेशन, अमळनेर), ज्ञानेश्वर धनगर (माजी तज्ज्ञ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर) उपस्थित राहतील.

### महिलांसाठी आनंद आणि चैतन्याची पर्वणी

आखाजी महोत्सव महिलांसाठी खरोखर आनंदाची आणि चैतन्याची पर्वणीच असेल. यावेळी खापरावर पुरणपोळी बनविणे, झोक्यावरील अहिराणी गीते, गौराईची अहिराणी गाणी, घट्यावर दळतानाची गाणी, आकर्षक वेशभूषा, एका मिनिटात उखाणे आदी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. प्रत्येक विजेत्याला अनुक्रमे गौराई आणि प्रथम– ५ हजार, द्वितीय– ३ हजार , तृतीय– २ हजार रुपये रोख आणि प्रमाणपत्र अशा स्वरूपाची बक्षिसे दिली जातील. त्याचप्रमाणे 'अहिराणी शब्द व संस्कृती' या विषयावर 'चालता–बोलता' हा प्रश्नमंजूषा कार्यक्रमही होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील बचत गटांचे अस्सल गावरान खाद्यपदार्थ आणि वस्तूंचे स्टॉल देखील महोत्सवस्थळी थाटले जातील.

### खानदेश साहित्य संघाचे मार्गदर्शक साहित्यिक

कृष्णा आनंदा पाटील (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त), सुभाष मोतीराम पाटील (ज्येष्ठ साहित्यिक), हिरामण अभिमन कंखरे (ज्येष्ठ कवी), गोकुळ गोविंदा बागूल (अहिराणी साहित्यिक), शाहीर नाना पाटील (अहिराणी साहित्यिक), भाऊसाहेब देशमुख (साहित्यिक).



अमळनेर : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना खा. शि. मंडळ संचलित श्रीमती द्रौ.रा. कन्या शाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी.



अमळनेर : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माल्यार्पन करताना सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी.

# महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अमळनेरात उत्साहात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : विद्ये विना मती गेली, मती विना निती गेली...! या उक्तीप्रमाणे अज्ञानाचा अंधकार दूर करणाऱ्या थोर समाजसेवक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती अमळनेर तालुक्यात उत्साहात साजरी करण्यात आली.**



अमळनेर : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माल्यार्पन करताना स्व. प. छ. भांडारकर कॉलेज ऑफ डीफार्मसी व स्व.र. का. केले. कॉलेज ऑफ बी.फार्मसीचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी.



अमळनेर : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माल्यार्पन करताना प्रताप हायस्कूलचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी.

### फार्मसी महाविद्यालयात

अमळनेर : येथील खान्देश शिक्षण मंडळ संचलित स्व.पंढरिनाथ छगनशेठ भांडारकर कॉलेज ऑफ डी.फार्मसी व स्व.र.का.केले.कॉलेज ऑफ बी.फार्मसी महाविद्यालयात थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीच्या विचारांना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.रविन्द्र स. सोनवणे व समन्वयक प्रा.डॉ.एम.एस.वाघ यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी महाविद्यालयातील प्रा.देवेश भावसार, प्रा.प्रितम पाटील, प्रा.स्वप्नाली, प्रा. छाया महाजन, प्रा. प्रगती पाटील, प्रा.गितांजली पाटील, प्रा. वैशाली कुलकर्णी व कार्यालयीन अधीक्षक श्री.अनिल महाजन, श्री. सुजित अमळकर, श्री. ज्ञानेश्वर चौधरी, श्री. जितेन्द्र पाटील, श्री. शिवाजी पाटील श्री.पंकज पवार, श्री.कैलास कड, श्री. विनय ब्रम्हे, श्री.प्रकाश पाटील, श्री. अतुल पाटील, श्री. प्रशांत चौधरी, श्री. यश शिंपी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदविका व पदवी विभागातील सर्व विद्यार्थी यांचे या निमीत्ताने फार्मसी विभागाचे चेअरमन श्री. योगेश मुंदडे यांनी अभिनंदन करुन खान्देश शिक्षण मंडळाची गुणवत्तेची, सुस्कृंततेची व एकजूटतेची परंपरा यापढे अखंडीतपणे सुरु ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्यात.

### सावित्रीबाई फुले विद्यालय व जुनिअर कॉलेज

येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख अतिथींनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

प्राचार्य पी. एम. कोळी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर ज्युनियर विभागाचे प्रमुख एस. एस. साळुंखे, एस. एस. पाटील आणि अनिल पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाला ज्युनियर विभागातील नितीन पाटील, आर. आर. पाटील, किरण पाटील, कल्याण नेरकर तसेच माध्यमिक विभागातील विजेंद्र गवळे, सुनील वाघ, दीपक पाटील, गौरव पाटील, हर्षल बेहरे, नीलिमा पाटील, रूपाली पाटील आदी शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामराव पाटील व सतीश बाविस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाळ हडपे यांनी केले, तर आभार प्रदर्शन समाधान पाटील यांनी केले.

### प्रताप हायस्कूल

येथील प्रताप हायस्कूलमध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक एस. बी. निकम यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास पाटील यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी समाजसुधारणा, शिक्षणप्रसार व स्त्रीशिक्षणासाठी केलेल्या कार्याचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रतिनिधी डी. एन. पालवे यांनी केले, तर आभारप्रदर्शन एन. आर. पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लक्ष्मण पाटील, विद्या पाटील, सचिन अहिरे, सुहास खाजोडकर, नम्रता दोरकर, जयश्री पाटील, सागर पवार व प्रसाद गोसावी यांचे सहकार्य लाभले.

### डी. आर. कन्या शाळा

खा. शि. मं. संचलित श्रीमती द्रौ. रा. कन्या शाळा, अमळनेर येथे आज क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांचा 11 एप्रिल हा जन्मदिवस (जयंती) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी मॅडम, उपमुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. बाविस्कर, पर्यवेक्षक श्री एस. पी. वाघ सर, ज्येष्ठ शिक्षक श्री एस. एस. माळी, ज्येष्ठ शिक्षक श्री एस. एस. वाघ, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती एस. आर. सोनवणे, कार्यालयीन रजिस्टर श्री शामभाऊ पवार, शिक्षकेतर प्रतिनिधी मनुभाऊ दीक्षित, तसेच सौ. पी. पी. जोशी यांनी प्रतिमा पूजन केले.

या महान क्रांतिसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या विचारांचे आचरण करून देशासाठी सकारात्मक कार्य करण्याचा निर्धार विद्यार्थीनींनी व्यक्त केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# अमळनेर नगरपरिषदेच्या कायदेशीर सल्लागारपदी सहा वकिलांची नियुक्ती

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील नगरपरिषदेचे कायदेशीर सल्लागार म्हणून अमळनेर शहरातील सहा वकिलांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात ॲड सुरेश सोनवणे, ॲड कुंदन साळुंखे, ॲड सारांश सोनार, ॲड सलीम खान, ॲड संदीप बोरसे व ॲड किरण पाटील यांचा समावेश आहे. नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी नुकतेच त्यांना नियुक्तीचे पत्र प्रदान केले. सदर वकील नगरपरिषदेच्या वतीने दिवाणी व फौजदारी प्रकरणांमध्ये, तसेच जिल्हा सत्र न्यायालय व वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयातील प्रकरणांमध्ये ते परिषदेची पॅनल वकील म्हणून बाजू मांडतील. या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



## जालियनवाला बाग हत्याकांड दिन विशेष

# भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक निर्णायक टप्पा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय इतिहासातील १३ एप्रिल १९१९ हा एक अत्यंत काळा दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी पंजाबमधील अमृतसर येथे घडलेले जालियनवाला बाग हत्याकांड ब्रिटीश सत्तेच्या क्रौर्याचे ज्वलंत उदाहरण ठरले. या घटनेने संपूर्ण देश हादरून गेला आणि स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा मिळाली. त्या काळात ब्रिटीश सरकारने 'रॉलेट कायदा' लागू केला होता. या कायद्यामुळे कोणत्याही व्यक्तीला न्यायालयीन प्रक्रिया न करता अटक करण्याचा अधिकार सरकारला मिळाला होता. या अन्यायकारक कायद्याच्या निषेधार्थ देशभरात आंदोलन सुरू होते. पंजाबमध्येही लोक शांततापूर्ण पद्धतीने आपला विरोध व्यक्त करत होते.

१३ एप्रिल रोजी बैसाखीचा सण असल्यामुळे हजारो लोक अमृतसरमधील जालियनवाला बाग येथे जमले होते. काही लोक सण साजरा करण्यासाठी आले होते, तर काहीजण रॉलेट कायद्याच्या निषेधार्थ सभा घेण्यासाठी उपस्थित होते. ही सभा पूर्णपणे शांततापूर्ण होती. याचवेळी ब्रिटीश सैन्याचे अधिकारी जनरल डायर आपल्या सैनिकांसह त्या बागेत पोहोचले. कोणतीही पूर्वसूचना किंवा इशारा न देता त्यांनी त्या निष्पाप, निःशस्त्र जमावावर गोळीबार करण्याचे आदेश दिले. बागेच्या अरुंद प्रवेशद्वारांमुळे लोकांना पळून जाण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. अंदाजे १०–१५ मिनिटे सतत गोळीबार सुरू राहिला.

या अमानुष हल्ल्यात शेकडो लोक मृत्युमुखी पडले, तर हजारो लोक जखमी झाले. अधिकृत आकडेवारीनुसार सुमारे ३७९ लोकांचा मृत्यू झाला, परंतु प्रत्यक्षात हा आकडा खूपच जास्त असल्याचे मानले जाते. अनेक लोकांनी गोळीबारापासून वाचण्यासाठी विहिरीत उड्या मारल्या, परंतु त्यातही त्यांचा मृत्यू झाला. जालियनवाला बाग हत्याकांडाने भारतीय जनतेच्या मनात प्रचंड संताप निर्माण केला. या घटनेनंतर महात्मा गांधींनी ब्रिटिशांविरुद्ध असहकार आंदोलन सुरू केले. देशभरात स्वातंत्र्याची चळवळ अधिक तीव्र झाली. अनेकांनी ब्रिटीश सत्तेविरुद्ध उघडपणे लढा देण्याचा निर्धार केला.

या घटनेचा आंतरराष्ट्रीय स्तरावरही निषेध करण्यात आला. ब्रिटीश सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला आणि या घटनेची चौकशी करण्यासाठी हंटर आयोगाची स्थापना करण्यात आली. तथापि, या चौकशीत जनरल डायरवर कोणतीही कठोर कारवाई करण्यात आली नाही. ज्यामुळे भारतीय जनतेचा रोष आणखी वाढला.

जालियनवाला बाग हत्याकांड हे केवळ एक दुःखद घटना नसून, ते भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक निर्णायक टप्पा आहे. या घटनेने भारतीयांना एकत्र आणले आणि स्वातंत्र्य मिळवण्याचा त्यांचा निर्धार अधिक दृढ केला. आज जालियनवाला बाग हत्याकांड दिनानिमित्त आपण त्या निरपराध शहिदांना आदरांजली अर्पण करतो. त्यांचे बलिदान व्यर्थ गेले नाही; त्यांच्या त्यागामुळेच आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. या घटनेतून आपण अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा घ्यायला हवी आणि



लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी सदैव सजग राहिले पाहिजे.
'ज्यांनी आपले प्राण अर्पण केले, त्यांचे स्मरण हेच खरे राष्ट्रभक्तीचे लक्षण आहे.'

# इराणच्या युद्धात भारताचे ते ६० वर्षांपूर्वीचे गाणे तुफान व्हायरल

## लिरिक्समुळे इंटरनेटवर ट्रेंडिंगला; त्यात नेमके काय आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इराण आणि जगाच्या अनेक भागांमध्ये वाढता तणाव, युद्धसदृश परिस्थिती आणि मानवी संकट असताना एक जुने गाणे अचानक सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. लोक याला शांतता, एकता आणि मानवतेचा संदेश म्हणत आहेत. हे गाणे कोणते आहे जाणून घेऊया...

हिंदी चित्रपटसृष्टीचे महान गायक मोहम्मद रफी यांनी १९४० ते १९८० पर्यंत आपल्या जादुई आवाजाने लाखो–करोडो लोकांच्या मनावर राज्य केले. त्यांच्या गाण्यांसाठी लोक कॅसेट्स विकत घेत आणि चित्रपटगृहात तासन्तास बसून राहत. रफी साहेबांच्या गाण्यांची लोकप्रियता भारताच्या सीमेपलीकडेही होती.

आता इराण आणि अमेरिकेतील युद्धाच्या तणावाच्या दरम्यान मोहम्मद रफींचे एक इंग्रजी गाणे अचानक व्हायरल झाला आहे. ट्विटर, इंस्टाग्राम आणि यूट्यूबवर हे गाणे मोठ्या प्रमाणात शेअर होत आहे.

रफी साहेबांनी आपल्या कारकिर्दीत फक्त दोन इंग्रजी



गाणी गायिली होती. त्यापैकी एक आहे 'Although We Hail from Different Lands'. हे गाणे १९६६ च्या 'सूरज' चित्रपटातील प्रसिद्ध गीत 'बहारों फूल बरसाओ'च्या धुनेवर आधारित आहे. दुसरे गाणे 'The She I Love Is A' हे १९६५ च्या 'गुमनाम' चित्रपटातील 'हम काले हैं तो क्या हुआ' या गाण्याच्या धुनेवर तयार झाले आहे.

दोन्ही गाण्यांचे बोल प्रसिद्ध कवी हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय यांनी लिहिले होते, पण ते कोणत्याही चित्रपटात वापरले गेले नव्हते. १९७० मध्ये सारगामा कंपनीने 'Although We Hail from Different Lands' हे गाणे रिलीज केले होते. २०२० मध्ये सारगामाने हे गाणे आपल्या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध केले. या गाण्यातील ओळी आजही मनाला स्पर्श करतात. "आम्ही वेगवेगळ्या देशांतून येऊ शकतो, पण आपली पृथ्वी, आकाश आणि सूर्य एकच आहे."

रफी साहेबांनी या गाण्यात युद्ध, द्वेष आणि संघर्षाविरुद्ध आवाज उठवला आणि मानवांना एकत्र, सौहार्दाने राहण्याचे आवाहन केले होते. हे गाणे 'कोल्ड वॉर'च्या काळात तयार झाले होते, तरीही आज इराण–यूएस तणावाच्या पार्श्वभूमीवर ते पूर्णपणे लागू पडते. सध्या जेव्हा जगात तणाव वाढत आहे, तेव्हा हे गीत शांततेचे प्रतीक बनून समोर आले आहे. लोक ते शेअर करताना म्हणत आहेत, की जगाला युद्ध नको, तर एकमेकांशी प्रेम, समजूत आणि शांतता हवी आहे. गाण्यातील ओळ "We want no hate, we want no strife आम्हाला द्वेष नको, आम्हाला कलह नको, कारण आम्ही प्रेम आणि जीवनासाठी जन्मलो आहोत" आजच्या परिस्थितीशी अगदी जुळते.

# जगातील वेगवेगळ्या जमाती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर आफ्रिकेत बर्बर्स नावाची जमात आढळून येते. अरबांनी आठव्या शतकात आक्रमण करण्याआधी ही जमात या देशात वास्तव्यास आहे. ॲटलास पर्वत, अल्जेरीया, मोरौक्को या ठिकाणी या जमातीचे अस्तित्व आढळून येते. या जमातीचा धर्म मुस्लिम असल्याचे सांगितले जाते. हे लोक बर्बर नावाची भाषा बोलतात. या जमातीचा आणि अरबांचा संघर्ष झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.

दक्षिण आफ्रिकेत झुलू नावाची जंगली जमात आढळून येते. दक्षिण आफ्रिकेचा प्रख्यात अष्टपैलू खेळाडू लान्स क्लुस्नर हा या जमातीतीलच



होता. दक्षिण आफ्रिकेतील नताल भागात झुलूलैंड नावाचा भाग आहे. तेथे या जमातीचे अस्तित्व आहे.

एकेकाळी ही जमात अत्यंत शक्तीशाली समजली जात होती. १९ व्या शतकाच्या प्रारंभी या जमातीने आपल्या आसपासच्या प्रदेशावर वर्चस्व निर्माण केले होते. दक्षिण आफ्रिका हा ब्रिटिश साम्राज्याचा भाग झाल्यानंतर या जमातीच्या वर्चस्वाला ओहोटी लागली. सध्या या जमातीची लोकसंख्या ५० लाखांपर्यंत असल्याचे सांगितले जाते. पशूपालन आणि शेती हा या जमातीचा मुख्य व्यवसाय आहे.

चीन आणि रशियाच्या सीमेवर मंगोलो वंशाचे लोक आढळून येतात. मंचुरीयातून आलेल्या या लोकांनी १३ व्या शतकात आसपासच्या अनेक प्रदेशावर आक्रमण केले होते. आता हा भाग मंगोलीया म्हणून ओळखला जातो. मंगोलीयातील मोठा भूभाग निबिड जंगलाचा आहे. या भूभागात कमालीची थंडी पडते. आशिया आणि युरोप या खंडांच्या सीमेवरचा हा भाग आहे.

पिम्मी ही जमात गॅबन, कॅमेरून आणि काँगो या देशांच्या जंगलांमध्ये आढळून येते. या जमातीचे लोक हत्तीची शिकार करतात. या जमातीतील लोकांची उंची खूपच कमी म्हणजे पाच फुटांपेक्षाही कमी असते. झाडांच्या फांद्यांपासून बनवलेल्या झोपड्यांमध्ये राहणारे पिम्मी लोक अंगावर लज्जा रक्षणापुरते वस्त्र नेसतात. प्राण्यांच्या शिकारीबरोबरच जंगलातील वेगवेगळी फळे हेही या जमातीचे अन्न आहे. या जमातीची लोकसंख्या गेल्या काही वर्षात झपाट्याने कमी होत आहे, असे दिसून आले आहे.

# सैन्यदलातील प्रशिक्षित श्वानांच्या निवृत्तीनंतर त्यांचे काय होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कुत्रा हा असा प्राणी आहे, जो अतिशय प्रामाणिक आहे. तसेच तो बुद्धिमान देखील आहे. तो ट्रेनिंगला लवकर प्रतिसाद देत असल्यामुळे आर्मी आणि पोलीस दलांमध्ये विशिष्ट प्रजातीची कुत्री पाळली जातात. मात्र रिटायरमेंटनंतर या श्वानांचे काय केले जाते? याचा कधी आपण विचार केला आहे का?

आर्मी आणि पोलीस दलांमध्ये तपास कामांसाठी कुत्र्यांची मदत घेतली जाते. कुत्रा हा असा प्राणी आहे, जो बुद्धिमान तर आहेच परंतु अतिशय प्रामाणिक देखील असतो. कुत्र्यांना सहज ट्रेन केले जाऊ शकते. तसेच तो नुसत्या वासावरून देखील एखाद्या व्यक्तीचा सहज माग काढू शकतो. त्यामुळे चोरांचा तसेच एखाद्या गंभीर गुन्ह्यातील आरोपींचा माग काढण्यासाठी पोलिसांना श्वानांची खूप मदत होत असते. कोणत्याही देशाची आर्मी किंवा पोलीस दल असो तेथे एक श्वानपथक हे असतेच. आर्मी आणि पोलीस दलासोबत काम करण्यासाठी काही खास विशिष्ट प्रजातीच्या



श्वानांची निवड केली जाते. त्या श्वानाला ट्रेनिंग दिले जाते. या ट्रेनिंगनंतर हे श्वान रिटायरमेंटपर्यंत आर्मी किंवा पोलीस दलासोबत काम करतात. मात्र अनेकदा असे देखील म्हटले जाते, की रिटायरमेंटनंतर आर्मीमधील कुत्र्यांना मारले जाते. नेमके त्यामागचे सत्य काय आहे? आपणास माहिती आहे का?


पूर्वी म्हणजे ब्रिटीश काळात ही पद्धत होती. ब्रिटीश काळात आर्मीमधून एखादा श्वान निवृत्त झाला, की त्याला मारण्यात येत होते. त्यामागील लॉजिक असे होते, की या श्वानाने अनेक वर्षे आर्मीसोबत काम केले आहे. त्यामुळे त्याला देशाच्या अनेक गुप्त गोष्टी माहिती असतात. असा श्वान शत्रूच्या हाती लागला तर त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा श्वानांना मारले जायचे. साधारणपणे एका श्वानाचे आयुष्य हे २० वर्षांपर्यंत असते, आर्मी किंवा पोलीस दलातील श्वान हे १३ व्या किंवा १४ व्या वर्षी निवृत्त होतात. कारण तेव्हा त्याची क्षमता कमी झालेली असते.

दरम्यान याविरोधात प्राणीमित्र संघटनांकडून आवाज उठवण्यात आला. त्यामुळे आता नियमात बदल करण्यात आला आहे. आता आर्मी किंवा पोलीस दलातील कुत्र्यांना मारले जात नाही. तर त्यांना आता मेरठ येथील ओल्ड ऐज होममध्ये ठेवण्यात येते. तेथे त्यांची काळजी घेतली जाते किंवा काही श्वान ही दत्तक देखील दिली जातात. आर्मीमधील कोणताही श्वान दत्तक देण्यापूर्वी त्याला पुन्हा एकदा सामान्य वर्तणुकीचे ट्रेनिंग दिली जाते. अगदीच नाइलाज असेल म्हणजे एखाद्या श्वानाला दुर्धर आजार असेल आणि तो बरा होणारच नसेल तर अशा स्थितीमध्ये क्विंचितप्रसंगी अशा श्वानांना दया मरण दिले जाते. मात्र आता आर्मीमधील कोणत्याही श्वानाला मारले जात नाही, रिटायरमेंटनंतरही त्यांचा सांभाळ केला जातो.

# रिंकूने शेअर केले 'रोमिओ'सोबतचे खास फोटो

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'सैराट' या चित्रपटाद्वारे घराघरांत पोहोचलेली लाडकी आर्ची म्हणजेच अभिनेत्री रिंकू राजगुरू. सध्या तिच्या एका सोशल मीडिया पोस्टमुळे ती जोरदार चर्चेत आली आहे. रिंकूच्या खासगी आयुष्याबद्दल जाणून घेण्यासाठी तिचे चाहते नेहमीच उत्सुक असतात. अशातच तिने चक्क आपल्या आयुष्यातील 'रोमिओ'ची ओळख करून दिल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. रिंकूने नुकताच सोशल मीडियावर एक अत्यंत गोंडस फोटो शेअर केला आहे. मात्र, हा 'रोमिओ' कोणी तरुण नसून तिचा लाडका पाळीव श्वान आहे.



रिंकूने आपल्या या लाडक्या श्वानाचे नाव 'रोमिओ' ठेवले असून, त्याच्यासोबत खेळतानाचे फोटो तिने शेअर केले आहेत. 'भेटा माझ्या आयुष्यातील खऱ्या रोमिओला,' असे कॅप्शन तिने या फोटोला दिले असून, ही पोस्ट सध्या तुफान व्हायरल होत आहे.रिंकूने शेअर केलेले हे फोटो व्हायरल झाले आहेत.

# पीसीएस अधिकारी बन घर पहुंची नीलम तो फूल–मालाओं से हुआ भव्य स्वागत

## बेटी को देख पति की नम हो गई आँखें

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रतिभा किसी परिचय की मोहताज नहीं होती, इसे सिद्ध कर दिखाया है डुमरियागंज तहसील के मधुकरपुर गांव की बेटी नीलम त्रिपाठी ने। उत्तर प्रदेश लोक सेवा आयोग द्वारा घोषित पीसीएस–२०२४ के अंतिम परिणाम में उन्होंने १६५ वीं रैंक हासिल कर नायब तहसीलदार के पद पर चयनित होकर जनपद का गौरव बढ़ाया है।

चयन के बाद वह पहली बार अपने गृह जनपद पहुंची, जहां स्वजनों, रिश्तेदारों और क्षेत्रीय नागरिकों ने जोरदार स्वागत किया। फूलों की वर्षा और मालाओं से लदी नीलम को देख पिता रामतेज त्रिपाठी की आंखें खुशी से छलक आईं।

जुलूस के माध्यम से ग्रामीणों को बेटियों की शिक्षा के प्रति जागरूक भी किया गया। उनकी प्रारंभिक शिक्षा राम जानकी इंटर कॉलेज,




गिरधरपुर में हुई। इसके बाद गुरु वशिष्ठ महाविद्यालय मनकापुर से स्नातक और इग्नू से परास्नातक की डिग्री ली। अपने चौथे प्रयास में उन्होंने इस प्रतिष्ठित परीक्षा को पास किया।

अपनी सफलता का श्रेय



माता–पिता के आशीर्वाद और गुरुओं के मार्गदर्शन को दिया है। उनकी इस उपलब्धि ने क्षेत्र की अन्य बालिकाओं के लिए प्रेरणा का मार्ग प्रशस्त किया है। स्वागत समारोह में मौजूद प्रबुद्ध वर्ग ने कहा कि ग्रामीण पृष्ठभूमि की बेटियों का प्रशासनिक सेवा में जाना महिला सशक्तिकरण की जीवंत मिसाल है।


शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५
वर्षांचा समृद्ध
अनुभव
असलेले
शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# वरुथिनी एकादशीचे महत्त्व काय?

## भगवान विष्णूंची कृपा मिळविण्यासाठी करा 'हे' प्रभावी उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वरुथिनी एकादशी ही वैशाख महिन्यातील कृष्ण पक्षात येते. यंदा ही सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी आहे. ही एकादशी अत्यंत शुभ आणि फलदायी मानली जाते. 'वरुथिनी' या शब्दाचा अर्थ 'संरक्षण करणारी' असा होतो.

**वरुथिनी एकादशीचे महत्त्व**

**पापांचा नाश :** असे मानले जाते, की या एकादशीचे व्रत केल्याने मनुष्याच्या सर्व पापांचा नाश होतो आणि त्याला मोक्षप्राप्ती होते.

**सौभाग्य आणि सुख :** हे व्रत केल्याने व्यक्तीला आयुष्यात सुख, समृद्धी आणि सौभाग्य लाभते. विशेषतः स्त्रियांसाठी हे व्रत अखंड सौभाग्य देणारे मानले जाते.

**दहा हजार वर्षे तपस्या करण्याचे फळ :** पौराणिक कथांनुसार वरुथिनी एकादशीचे फळ हे दहा हजार वर्षे कठोर तपस्या केल्याने मिळणाऱ्या फळासमान असते.

**अन्नदान आणि कन्यादानाचे फळ :** या एकादशीचे महात्म्य ऐकल्याने किंवा वाचल्याने हजारो वर्षांच्या अन्नदानाचे आणि कन्यादानाचे पुण्य प्राप्त होते.

**वरुथिनी एकादशीला करायचे उपाय**

या दिवशी भगवान विष्णूंची कृपा मिळविण्यासाठी उपाय करणे फायदेशीर ठरते.



**भगवान विष्णूंचा अभिषेक :** या दिवशी भगवान विष्णूंच्या मूर्तीवर किंवा दक्षिणावर्ती शंखात पाणी भरून अभिषेक करावा. अभिषेकाच्या पाण्यात थोडे केशर टाकणे अत्यंत शुभ मानले जाते.

**तुळशीची पूजा :** एकादशीच्या दिवशी तुळशीला जल अर्पण करावे (मात्र एकादशीला तुळशीची पाने तोडू नयेत). सायंकाळी तुळशीजवळ शुद्ध तुपाचा दिवा लावावा आणि 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करावा.

**पिंपळाच्या झाडाची पूजा :** भगवान विष्णूंचा पिंपळात वास असतो, असे मानले जाते. त्यामुळे या दिवशी पिंपळाच्या झाडाला पाणी अर्पण करून दिवा लावल्याने पितृदोष आणि आर्थिक अडचणी दूर होण्यास मदत होते.

**दानधर्म :** वरुथिनी एकादशीला अन्नदान, वस्त्रदान किंवा गरजू व्यक्तींना मदत करणे अत्यंत पुण्यकारक असते. शक्य असल्यास गरिबांना पाणी पाजण्यासाठी माठ किंवा छत्री दान करावी.

**पांढऱ्या वस्तूंचा वापर :** भगवान विष्णू यांच्या पूजेत पिवळी फुले, पिवळी फळे आणि गोड पांढऱ्या पदार्थांचा (उदा.- खीर) नैवेद्य दाखविणे उत्तम असते.

या दिवशी कांदा, लसूण आणि मसूर डाळ खाणे टाळावे. तसेच पूर्ण दिवस नामस्मरण आणि सात्त्विक विचारांमध्ये घालवावा.

# भजन करतेवेळी मन विचलित होते, वाईट विचार येतात?

## प्रेमानंद महाराज यांनी दिले उत्तर, सांगितले प्रभावी आणि सोपे उपाय



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भजन, नामस्मरण किंवा ध्यान करत असताना अनेकदा मन भरकटते, नको ते विचार येतात, असा अनुभव अनेकांना येत असतो. याच विषयावर प्रेमानंद महाराज यांनी उपाय सांगितला आहे. ते म्हणाले, की मनाला करमणूक आणि संसारी सुखाची आकर्षणे असतात. मन मुळातच चंचल आणि अस्थिर असते. चांगले-वाईट असा विचार न करता जेथे सुख वाटते तिकडे ते धाव घेते. ही मनाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. त्यामुळे भजनावेळी नको ते विचार येणे काही नवीन नाही.

**वृत्तपत्र सदस्यता**

महाराज सांगतात, की आतापर्यंत आपण मनाच्या सांगण्यावर चालत होतो. पण जेव्हा अध्यात्माकडे वळतो तेव्हा पहिल्यांदाच मनाला शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू होतो. अशावेळी मन अस्थिर होते. ते पुन्हा जुन्या सवयींकडे ओढण्याचा प्रयत्न करते. पण जर आपण संयम ठेवला, तर हळूहळू मन आपल्या नियंत्रणात येऊ लागते.

ते सांगतात, की मनाला आपण जसे सांगू तसे ते वागू लागते. सुरूवातीला ते अस्थिर होईल, त्रास देईल, अस्वस्थ करेल. पण त्या अस्वस्थतेला सहन केले, तर मन आपल्या नियंत्रणात येते. तस नाही झाले तर मन आपल्यावर राज्य करू लागते.

महाराज म्हणतात, की 'जो स्वतःच्या मनाला शिष्य बनवतो, तोच खरा गुरू. इतरांना शिष्य बनविणे सोपे आहे, पण मनाला नियंत्रणात आणणे हीच खरी साधना आहे.'

मन शांत ठेवण्यासाठी ते काही सोपे उपाय सांगतात, देवाचे नामस्मरण करणे, सत्संगात बसणे आणि नियमित भक्तीचा सराव करणे. सतत रिकामे राहिले की मन नकारात्मक विचारांकडे झुकते. त्यामुळे मन चांगल्या कामात, चांगल्या विचारांत आणि भतीत गुंतवून ठेवणे फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, सातत्याने देवाचे नामस्मरण केल्यास हळूहळू मन शुद्ध होते, वाईट विचार कमी होतात आणि अंतःकरण शांत होते.

# परान्न का घेऊ नये?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बासमती तांदूळ विकणारा एक व्यापारी रोज रेल्वेने प्रवास करत असे. त्याच्यातून एकदिवस त्याची स्टेशन मास्तरांशी ओळख झाली. पुढे त्याचे गाढ मैत्रीत रूपांतर झाले. स्टेशन मास्तरांशी मैत्रीमुळे त्याला बोगीतून चोरून काढलेला सुवासिक तांदूळ अगदी स्वस्तात चांगला मिळू लागला. असे खूप दिवस चालले.

व्यापाऱ्याने विचार केला की इतके पाप होतेय तर थोडा दानधर्म पण व्हायला हवा. एकदिवस त्याने बासमती तांदुळाची खीर बनवली आणि एका साधूला आमंत्रित केले. त्यानुसार साधू महाराजांनी व्यापाऱ्याच्या आमंत्रणाचा स्वीकार करून त्यांच्या घरी गेले. पाहुणचार घेतला. भोजन केले. खिरीचा आस्वाद घेतला. दुपारची वेळ होती. व्यापारी म्हणाला, की 'महाराज थोडावेळ आराम करा. ऊन कमी झाले की जा.' साधू महाराजांनी ते ऐकले. ते आराम करत असलेल्या बेडमध्ये लपवून व्यापाऱ्याने खूप मोठ्या रकमेच्या नोटांची बंडल ठेवली होती. साधू महाराजांनी त्या बेडवर आराम केला. त्यांना नोटांची चाहूल लागली. इतक्या बंडलांपैकी दोन- चार बंडल झोळीत घातली तर काय फरक पडणार आहे? व्यापाऱ्याला ते समजणार देखील नाही. असा विचार करून त्यांनी तीन-चार बंडल झोळीत घातले.

सायंकाळी व्यापाऱ्याला आशीर्वाद देऊन साधू महाराज निघून गेले.

दुसऱ्या दिवशी व्यापारी नोटा मोजायला बसल्यावर त्याच्या लक्षात आले, की पैसे कमी आहेत. व्यापारी विचार करू लागला, की महाराज कसे चोरी करतील? व्यापाऱ्याने नोकरांची पिटाई चालू केली. इतक्यात साधू महाराज तेथे पोहोचले. आपल्या झोळीतून नोटांचे बंडल काढून व्यापाऱ्याला देत म्हणाले, की 'नोकरांना मारू नका. मी पैसे घेऊन गेलो होतो.' व्यापारी म्हणाला, की 'महाराज तुम्ही कसे पैसे चोराल? येथे नोकरांकडे चौकशी सुरू केल्यानंतर भीतीने त्यांच्यापैकी कुणीतरी तुम्हाला ते पैसे दिले असतील आणि नोकराला वाचवण्यासाठी तुम्ही असे बोलत असाल.' साधू महाराज म्हणाले, की 'हा दयाळूपणा नाही. खरोखर मी मोहापायी पैसे चोरले होते.' साधू महाराज म्हणाले, की 'शेठ तुम्ही खरोखर सांगा, काल तुम्ही खीर का आणि कशाची बनवली होती?' व्यापाऱ्याने खरी खरी सर्व हकीकत त्यांना सांगितली. साधू महाराज म्हणाले, की 'चोरीच्या तांदळाची खीर खाल्यामुळे माझ्या मनात पण चोरीची भावना निर्माण झाली. सकाळी जेव्हा पोट मोकळे झाले, तेव्हा माझी बुद्धी पुन्हा जागेवर आली आणि माझ्याकडून किती मोठी चूक झाली त्याची जाणीव झाली.' 'माझ्यामुळे बिच्चाऱ्या नोकरांना त्रास झाला असेल म्हणून मी तुमचे पैसे परत करायला आलो.' म्हणूनच जसे खाऊ अन्न तसे होईल मन. जसे पिऊ पाणी, तशी होईल वाणी. जशी शुद्धी तशी बुद्धी. जसे विचार, तसा संसार...!

# संत हे चालते-बोलते देव!

व्यवहारात ज्याला चांगले वागता येत नाही त्याला परमार्थ करता येणार नाही. व्यवहारात झालेल्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देणार नाही असा निश्चय करावा आणि सद्गुरू आज्ञा प्रमाण मानून तो तडीस न्यावा. साधनेवर जोर द्यावा. स्वतः कोण याची ओळख करून घ्यावी. भगवंतापरते कोणी नाही हे कळले म्हणजे मी कोण हे कळते. निर्गुण जरी समजले तरी सगुण नाही सोडू. माझ्या मुखी राम आला यासारखे दुसरे भाग्य ते कोणते? हृदयात स्फूर्ती येऊनच आपण बोलतो; मग आमच्या मुखात राम आला तर तो हृदयात नाही, असे कसे म्हणावे? संताचा समागम केला म्हणजे आपण मार्गाला लागतो. आपण साधूला व्यवहारात आणतो, आणि नंतर तो आपल्याशी व्यवहाराने वागला म्हणजे त्याच्याजवळ समता नाही म्हणून उलट ओरड करतो. संत हे देहाचे रोग बरे करीत नसून, त्या रोगांची भीती नाहीशी करतात. संत हे चालते-बोलते देवच आहेत. संतांच्या देहाच्या हालचालींना महत्त्व नाही. भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हेच खरे संतांचे कार्य होय. संतांचा कोणताही मार्ग हा वेदांच्या आणि शास्त्रांच्या उलट असणे शक्यच नाही. संत सूर्यासारखे जगावर स्वाभाविक उपकार करतात. सूर्याचे तेज कमी होते आहे असे शास्त्रज्ञ म्हणतात, पण संतांचे तेज मात्र वाढतेच आहे. श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आलेला मुलगा भीक मागताना पाहून आपल्याला त्याची कींव येते, त्याप्रमाणे मनुष्यजन्माला येऊन आपण दुःख करतो हे पाहून संतांना वाईट वाटते. एकूण योनी इतक्या आहेत, की त्यामध्ये मनुष्यजन्म येणे कठीण आहे. मनुष्यजन्म येऊन भगवंताची प्राप्ती झाली नाही तर जीवाचे फार नुकसान आहे. म्हणून अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, त्यांची कृपा प्राप्त करून घ्यावी. संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भीतीच नाही. आपण प्रपंचात इतके खोल जातो की संतांची हाक ऐकूच येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे. संतवचनावर विश्वास ठेवू या, म्हणजे भगवंतप्रेम लागेलच. ते लागल्यावर विषयप्रेम कमी होईल. म्हणून संतांची संगत करणे एवढे जरी केले तरी कल्याणच होईल.

# पुष्टीमार्ग परंपरेच्या अनुयायांसाठी समर्पित..!

## वल्लभाचार्य जयंती विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वल्लभाचार्य जयंती हा पुष्टीमार्ग परंपरेच्या अनुयायांसाठी एक महत्त्वपूर्ण दिवस आहे. ही परंपरा भगवान श्रीकृष्णांच्या, विशेषतः त्यांच्या श्रीनाथजी रूपाच्या उपासनेसाठी समर्पित आहे. हा दिवस वल्लभाचार्यांच्या जन्मदिनानिमित्त अर्थात तिथीनुसार (१३ एप्रिल रोजी) साजरा केला जातो. ते एक आदरणीय संत आणि तत्त्वज्ञ होते, ज्यांनी भारतातील भक्तीपर प्रथांना आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांची शिकवण आजही लाखो भक्तांच्या मनात खोलवर रुजलेली आहे, जी श्रीकृष्णांप्रती प्रेम, कृपा आणि निरपेक्ष भक्तीवर भर देते. वल्लभाचार्य जयंतीचा उत्सव त्यांच्या जीवनावर आणि शिकवणीवर चिंतन करण्याची संधी देतो. ज्यांनी भारताच्या आध्यात्मिक परिदृश्यावर चिरस्थायी प्रभाव टाकला आहे.

वल्लभाचार्यांच्या सर्वांत महत्त्वपूर्ण योगदानांपैकी एक म्हणजे पुष्टीमार्गाची स्थापना, ज्याचा अर्थ कृपेचा मार्ग असा होतो. विधी किंवा बौद्धिक ज्ञानावर लक्ष केंद्रित करणाऱ्या इतर पंथांच्या विपरीत, पुष्टीमार्ग या कल्पनेवर केंद्रित आहे, की ईश्वरभक्ती प्रयत्नांनी मिळविली जात नाही, तर ती दैवी कृपेने प्राप्त होते. हा पंथ भक्त आणि कृष्ण यांच्यातील निरपेक्ष प्रेमावर भर देतो, जेथे भक्त कृष्णाच्या दैवी कृपेवर विश्वास ठेवून स्वतःला पूर्णपणे त्याच्या इच्छेपुढे समर्पित करतो. भक्तीचा हा अनोखा दृष्टिकोन एक असा आध्यात्मिक मार्ग उपलब्ध करून देतो, जो सामाजिक किंवा आर्थिक स्थितीचा विचार न करता सर्वांसाठी सुलभ आहे.

भक्तीमय साधनांमधील योगदानाव्यतिरिक्त, वल्लभाचार्य त्यांच्या तात्त्विक शिकवणींसाठी, विशेषतः शुद्धाद्वैत किंवा शुद्ध अद्वैतवादाच्या संकल्पनेसाठीही ओळखले जातात. वल्लभाचार्यांच्या मते, आत्मा आणि ईश्वर वेगळे नाहीत; ते एका दिव्य नात्यात शाश्वतपणे एकरूप आहेत. हे तत्त्वज्ञान दैवी आणि मानवी यांच्यातील द्वैताची कल्पना नाकारते आणि असे प्रतिपादन करते की विश्वातील प्रत्येक गोष्ट ही ईश्वराच्या दिव्य स्वरूपाची अभिव्यक्ती आहे. वल्लभाचार्यांसाठी, या एकत्वाचा साक्षात्कार हाच मुक्तीचा मार्ग आहे, आणि भक्ती व शरणागतीद्वारेच भक्त ईश्वराशी एकरूपतेचा परमानंद अनुभवू शकतो.


वल्लभाचार्य जयंती अनुयायांना त्यांची भक्ती अधिक दृढ करण्याची, त्यांच्या शिकवणींवर मनन करण्याची आणि नम्रता, निःस्वार्थता व सेवेचे जीवन जगण्याचा प्रयत्न करण्याची आठवण करून देते. हा दिवस कृष्णाच्या कृपेचा आणि प्रेमाचा उत्सव साजरा करण्याचा आहे, जे भक्तांच्या हृदयात परिवर्तन घडवून त्यांना आध्यात्मिक पूर्तता आणि दिव्य आनंदाच्या जवळ घेऊन जाते. या दिवसाचे पालन केवळ धार्मिक भक्तीलाच नव्हे, तर आंतरिक शांती, करुणा आणि ईश्वराशी असलेल्या संबंधाच्या गहन भावनेलाही प्रेरणा देते.

**उत्सवाचा इतिहास**

पुष्टीमार्ग परंपरेचे संस्थापक, एक आदरणीय संत, तत्त्वज्ञ आणि धर्मशास्त्रज्ञ असलेल्या वल्लभाचार्यांच्या जन्मदिनानिमित्त हा उत्सव साजरा केला जातो. त्यांचा जन्म भारतीय अध्यात्माच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण प्रसंग आहे. कारण भक्ती, ईश्वरप्रेम आणि दैवी कृपा यांबद्दलच्या त्यांच्या शिकवणी आणि योगदानाचा जगभरातील लाखो भक्तांवर चिरस्थायी प्रभाव पडला आहे. वल्लभाचार्य जयंतीचा उत्सव त्यांच्या जीवनाचा आणि शिकवणीचा सन्मान करतो, तसेच भारतातील धार्मिक प्रथा, तत्त्वज्ञान आणि भक्तीमार्गांवर त्यांनी पाडलेल्या गहन प्रभावाचा गौरव करतो.

वल्लभाचार्य यांचा जन्म इ.स. १४७९ मध्ये, सध्याच्या भारतातील बिहार राज्यातील चंपारण या गावात झाला. लहानपणापासूनच वल्लभाचार्य यांनी विलक्षण आध्यात्मिक ओढा आणि भगवान कृष्णाप्रती भक्ती दाखविली. वेदांतातील त्यांचे अपवादात्मक पांडित्य, शास्त्रांचे सखोल ज्ञान आणि भगवान कृष्णावरील त्यांचे अढळ प्रेम यांमुळे ते त्यांच्या काळातील सर्वात प्रभावशाली संतांपैकी एक बनले. विधी किंवा तपश्चर्येवर भर देणाऱ्या अनेक धार्मिक नेत्यांच्या विपरीत, वल्लभाचार्यांनी मुक्ती मिळवण्याचे अंतिम साधन म्हणून भक्ती आणि ईश्वरी कृपेच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित केले.

वल्लभाचार्यांच्या आध्यात्मिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे नाथद्वारा शहरात श्रीनाथजींच्या मूर्तीशी झालेली त्यांची भेट. त्यांनी त्या मूर्तीला भगवान श्रीकृष्णांचे साक्षात रूप म्हणून ओळखले आणि आपले जीवन श्रीनाथजींच्या उपासनेचा प्रसार करण्यासाठी समर्पित केले. याच भक्तीमुळे अखेरीस पुष्टीमार्ग पंथाची स्थापना झाली, जो दैवी कृपेच्या कल्पनेवर विशेष भर देतो. या मार्गात, अनुयायांचा असा विश्वास आहे, की श्रीकृष्ण आपल्या असीम करुणेने भक्तावर कृपा करतात, ज्यामुळे त्यांना ईश्वराशी अंतिम मिलन अनुभवता येते. भक्तीचा हा मार्ग साधेपणा, नम्रता आणि ईश्वराप्रती असलेल्या गहन प्रेमाच्या भावनेने वैशिष्ट्यपूर्ण आहे.



**वल्लभाचार्य जयंती कशी साजरी कराल?**

वल्लभाचार्य जयंती हा पुष्टीमार्ग परंपरेच्या अनुयायांसाठी एक महत्त्वपूर्ण प्रसंग आहे आणि तो भक्तीभावाने व आदराने साजरा केला जातो. या उत्सवात वल्लभाचार्यांच्या जीवनाचा आणि शिकवणीचा सन्मान करणाऱ्या अनेक आध्यात्मिक प्रथा आणि विधींचा समावेश असू शकतो. दिवसाची सुरूवात सहसा विधीवत स्नानाने होते. त्यानंतर भगवान कृष्णाची, विशेषतः त्यांच्या श्रीनाथजी रूपाची प्रार्थना आणि अर्पण केले जाते. भक्त सकाळच्या प्रार्थनेत सहभागी होण्यासाठी श्रीनाथजी किंवा पुष्टीमार्गाला समर्पित मंदिरांना भेट देतात. यामध्ये भक्तीगीते (भजन) गाणे आणि आरती करणे यांचा समावेश असू शकतो, ज्यामध्ये देवतेला पवित्र दिवा अर्पण केला जातो. या उत्सवाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे धर्मग्रंथांचे पठण, विशेषतः वल्लभाचार्यांच्या शिकवणींवर, जसे की त्यांचे शुद्धाद्वैत तत्त्वज्ञान, प्रकाश टाकणाऱ्या ग्रंथांचे पठण. भक्तगण त्यांच्या जीवनाबद्दल आणि भक्ती, शरणागती व कृपेच्या महत्त्वाविषयीची प्रवचने ऐकण्यासाठी मंदिरात किंवा घरी एकत्र जमतात. दिवसा विशेष प्रार्थना आणि पूजा केली जाते, ज्यात भक्तीचे प्रतीक म्हणून श्रीनाथजींना अन्न आणि फुले अर्पण केली जातात. काही ठिकाणी, भक्त नम्रता आणि आदराची भावना जपण्यासाठी उपवास करतात किंवा साधे जेवण करतात. सायंकाळी अधिक भजने आणि भक्तिगीते गायली जाऊ शकतात, जेथे विविध समुदाय कृष्णाप्रती आपले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एकत्र येतात.

वल्लभाचार्य जयंती पूजा विधी वल्लभाचार्य जयंती पूजा विधी हा वल्लभाचार्यांच्या जीवनाचा आणि शिकवणीचा सन्मान करणारा एक पवित्र आणि अर्थपूर्ण विधी आहे. ही पूजा भगवान श्रीकृष्णाप्रती, विशेषतः त्यांच्या श्रीनाथजी रूपाप्रती असलेल्या भक्तीवर केंद्रित आहे. पूजेच्या प्रक्रियेसाठी येथे टप्प्याटप्प्याने मार्गदर्शन दिले आहे.

स्वच्छता आणि तयारी : सर्वप्रथम घर किंवा ज्या ठिकाणी पूजा करायची आहे ती जागा स्वच्छ करा. ती जागा स्वच्छ आणि विचलित करणाऱ्या गोष्टींपासून मुक्त असल्याची खात्री करा. एक लहान वेदी किंवा पूजा थाळी तयार करा, ज्यावर श्रीनाथजींचे चित्र किंवा मूर्ती, तसेच फुले, उदबत्त्या, दिवा आणि फळे व मिठाई यांचा नैवेद्य ठेवा.

पवित्रतेसाठी प्रार्थना करा : सभोवतालच्या परिसरात शांती आणि पावित्र्यासाठी आशीर्वाद मागून, पवित्रतेसाठी प्रार्थना करून पूजेची सुरुवात करा. दैवी शांती प्राप्त करण्यासाठी 'ओम शांती शांती शांती' यासारखी ही एक साधी प्रार्थना असू शकते.

भगवान श्रीकृष्णाचे आवाहन : दिवा आणि उदबत्त्या लावा आणि श्रीनाथजींच्या मूर्तीला किंवा चित्राला अर्पण करा. असे करताना, त्यांच्या उपस्थितीचे आवाहन करण्यासाठी भगवान श्रीकृष्णाच्या नावाचा किंवा 'ओम नमो भगवते वासुदेवाय' यांसारख्या विशिष्ट मंत्रांचा जप करा. वल्लभाचार्यांच्या शिकवणींचे पठण करा : वल्लभाचार्यांच्या शिकवणींवर, विशेषतः त्यांच्या शुद्धाद्वैताच्या तत्त्वज्ञानावर आणि कृपेच्या (पुष्टी) संकल्पनेवर क्षणभर मनन करा. भक्त त्यांच्या शिकवणींवर प्रकाश टाकणाऱ्या स्तोत्रांचे किंवा श्लोकांचे पठण करू शकतात किंवा ते ऐकू शकतात. 'पुष्टिमार्ग प्रार्थना' किंवा कोणताही संबंधित भक्तिग्रंथ वाचता येतो.

देवतेला अर्पण : प्रेम आणि भक्तीचे प्रतीक म्हणून श्रीनाथजींच्या मूर्तीला किंवा चित्राला फुले, फळे आणि मिठाई अर्पण करा. भगवान कृष्णाच्या कृपेची जाणीव ठेवून, प्रत्येक अर्पण कृतज्ञता आणि आदराने केले पाहिजे.

भजन गायन : भगवान श्रीकृष्णाला समर्पित भक्तीपूर्ण भजने किंवा स्तोत्रे गाणे हा पूजेचा एक अविभाज्य भाग आहे. भक्त 'जय श्रीनाथजी' सारखी किंवा

श्रीकृष्णाप्रती प्रेम आणि शरणागती व्यक्त करणारी इतर भक्तीगीते गाऊ शकतात.

आशीर्वादासाठी प्रार्थना नैवेद्य आणि प्रार्थना पूर्ण झाल्यावर, समृद्धी, शांती आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी आशीर्वाद मिळवण्याकरिता भगवान श्रीकृष्ण आणि वल्लभाचार्य यांची प्रार्थना करा. हा आत्मचिंतनाचा, मार्गदर्शनाचा आणि दैवी कृपेचा धावा करण्याचा काळ आहे.

आरतीने समारोप करा : पूजेचा समारोप करण्यासाठी, आरती करा (देवतेभोवती पेटलेला दिवा फिरवण्याचा विधी). देवतेप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'जय श्रीनाथजी की हे आरती गीत गा.

प्रसादाचे वाटप : पूजेनंतर भगवान कृष्णाला अर्पण केलेले नैवेद्य (जसे की फळे, मिठाई आणि फुले) हे विधीदरम्यान मिळालेल्या दैवी आशीर्वादाचे प्रतीक म्हणून कुटुंबातील सदस्यांमध्ये आणि भक्तांमध्ये प्रसाद म्हणून वाटले जातात.

या पायऱ्यांचे अनुसरण करून, वल्लभाचार्य जयंती पूजा ही भगवान कृष्णाशी आध्यात्मिकरित्या जोडले जाण्याची, वल्लभाचार्यांच्या शिकवणींचा सन्मान करण्याची आणि भक्ती व प्रार्थनेद्वारे दैवी आशीर्वाद मिळवण्याची एक संधी आहे.

### वल्लभाचार्य जयंती पूजा मंत्र

**हरे कृष्ण मंत्र, ज्याला महामंत्र असेही म्हणतात, हा गौडीय वैष्णव परंपरेतील एक अत्यंत पूजनीय जप आहे, जो इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्ण कॉन्शियसनेस (इस्कॉन) च्या अनुयायांनी लोकप्रिय केला आहे. हा मंत्र ध्यान, प्रार्थना आणि भगवान कृष्णाप्रती भक्तीसाठी वापरला जातो. आध्यात्मिक ज्ञानप्राप्ती, मनाची शुद्धी आणि ईश्वराशी नाते जोडण्याचे हे एक शक्तिशाली साधन मानले जाते.**

**हरे कृष्ण मंत्र पुढीलप्रमाणे आहे.**

**'हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण, हरे हरे, हरे राम, हरे राम, राम राम, हरे हरे.'**

### वल्लभाचार्य जयंती व्रत विधी

**वल्लभाचार्य जयंती व्रत कथा ही एक पारंपरिक उपवासाची कथा आहे, जी वल्लभाचार्यांच्या शिकवणीचे महत्त्व आणि हे व्रत पाळण्याचे आध्यात्मिक फायदे दर्शवते. ही कथा वल्लभाचार्यांशी आणि त्यांनी सांगितलेल्या प्रथांशी निगडित असलेली गहन भक्ती, पवित्रता आणि कृपा यावर प्रकाश टाकते. परंपरेनुसार एकदा एक भक्त भगवान श्रीकृष्णांची कृपा आणि आशीर्वाद कसा मिळवावा याबद्दल मार्गदर्शन घेण्यासाठी वल्लभाचार्यांकडे आला. एक महान तत्त्वज्ञ आणि आध्यात्मिक गुरू असलेल्या वल्लभाचार्यांनी त्या भक्ताला भगवान श्रीकृष्णाच्या सन्मानार्थ एक दिवसाचा उपवास करून तो संपूर्ण दिवस प्रार्थना, ध्यान आणि शरणागतीसाठी समर्पित करण्याची सूचना दिली. वल्लभाचार्यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या स्वतःच्या जन्मदिवसाच्या या शुभ दिवशी उपवास केल्याने आत्म्याचे शुद्धीकरण होते आणि श्रीकृष्णांची कृपा आकर्षित होते.**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)